महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२३/प्र.क्र.४७१/२०२३/जाहिरात दिनांक: १६ फेब्रुवारी, २०२४

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : विविध विषयांतील प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक / विभाग प्रमुख / अधिव्याख्याता, महाराष्ट्र कला सेवा, गट-अ - शासकीय कला महाविद्यालय आणि विविध विषयांतील प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा)**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक - ०६३/२०२३, ०६४/२०२३, ०६५/२०२३, ०६६/२०२३, ०६७/२०२३ आणि जाहिरात क्रमांक - ११२/२०२३, ११३/२०२३**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्राप्त मागणीपत्रानुसार **कला संचालनालयाच्या नियंत्रणाखालील विविध विषयांतील प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक / विभाग प्रमुख / अधिव्याख्याता, महाराष्ट्र कला सेवा, गट-अ - शासकीय कला महाविद्यालय (जाहिरात क्रमांक-०६३/२०२३, ०६४/२०२३, ०६५/२०२३, ०६६/२०२३, ०६७/२०२३) तसेच उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत** शासकीय महाविद्यालये/संस्थेमधील **विविध विषयांतील प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा) (जाहिरात क्रमांक-११२/२०२३, ११३/२०२३)** या संवर्गाच्या जाहिराती आयोगामार्फत अनुक्रमे दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ आणि दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तथापि, अर्ज स्वीकारताना उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार ते कोणत्या विषयाकरीता अर्ज करीत आहेत, याबाबत त्यांच्या विषयांचा विकल्प घेण्यात आलेला नाही.

**२.** विषयांकित सर्व संवर्गांकरीता महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ अनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये / संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, दिनांक ११ एप्रिल, २०२२ अन्वये पदभरतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. यास्तव, विषयाधीन संवर्गनिहाय अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार विषय/विकल्प निवडण्याकरीता **दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ ते दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४** या कालावधीमध्ये ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**३.** संवर्गनिहाय विषयाचा विकल्प निवडीकरीता उमेदवारांनी त्यांच्या प्रोफालइमधील My Account मध्ये जाऊन अर्ज केलेल्या संवर्गाच्या जाहिरातीची निवड करुन त्यामधील Question हे बटन निवडून त्यात नमूद केलेले विषयाचा विकल्प निवडणे आवश्यक आहे. एकदा विषय निवडून Select बटन अंतिम केल्यानंतर पुन्हा विषयाच्या विकल्पामध्ये दुरुस्ती/सुधारणा करता येणार नाही. उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार निवडलेले विषय अंतिम समजण्यात येवून त्या विषयाकरीता त्यांचा विचार करण्यात येईल.

**४.** संवर्गनिहाय अर्ज केलेल्या संबंधित उमेदवारांना त्यांच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक तसेच Email ID वर SMS / Email द्वारे सूचित करण्यात येईल. सद्यस्थितीत अर्ज केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि त्यांनी निवडलेल्या विषयांचे विकल्प याची पात्रता न तपासता विकल्प स्वीकारण्यात येत आहेत. **विहित कालावधीत उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार विषय निवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास, उमेदवाराने त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार विषय निश्चित करुन त्यानुसार त्यांचा विषयाचा विकल्प ठरविण्यात येईल.**

**५.** उमेदवारांनी निवडलेले विषय आणि त्यांच्या अर्जातील शैक्षणिक अर्हता न तपासता विषयनिहाय विकल्प स्वीकारण्यात येत असून अर्जांची छाननी करताना उमेदवारांना पात्र/अपात्र ठरविण्यात येईल.

**६.** विषयांकित सर्व जाहिरातींमधील अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

**७.** सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०६३/२०२३, ०६४/२०२३, ०६५/२०२३, ०६६/२०२३, ०६७/२०२३ आणि जाहिरात क्रमांक ११२/२०२३, ११३/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.